श्री. स्टॅलिन डी. (जिल्हा ठाणे) तक्रार क्र. 15

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे यांचे कार्यालय,
ठाणे पश्चिम - ४००६०१
फोन नं. ०२२-२५३४३५३२
**Email ID :- cp.thane.sbsecurity@mahapolice.gov.in**

---

जा.क्र.पोउपआ/सुरक्षा शाखा/कांदळवन/ /२०२३ दिनांक ०६ /०१/२०२३

---

विषयः- श्री.स्टॅलिन डी (वनशक्ती) यांची कांदळवन ऱ्हास झाले बाबतची
दिनांक ३१/०५/२०२१ रोजीची तक्रार.

संदर्भ :- १)ठा.म.पा/प्रनिक/४७७/२०२२-२३ दिनांक ४/१०/२०२२चे पत्र.
२)जा.क्र./राबोडी पोस्टे/५३/२०२३ दि.०४/०१/२०२३ अन्वये.

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर की, अर्जदार श्री.स्टॅलिन डी (वनशक्ती)यांनी मा. पोलीस आयुक्त सो. ठाणे शहर यांचे नावे असलेला भुंखड मौजे माजीवाडे,साकेत रोड येथील स.न.३८६/३ या जागेवरील कांदळवन क्षेत्र ऱ्हास झालेबाबत तक्रारीचे पत्र, मुख्य पर्यावरण अधिकारी तथा सदस्य सचिव ठामपा कांदळवन समिती ठाणे महानगर पालिका यांचे वरिल संदर्भ १ अन्वये प्राप्त पत्रान्वये कळविले आहे.

वरील नमुद तक्रारी बाबत चा अहवाल वरील संदर्भ २ अन्वये आज पावेतो केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त झाला असुन, त्यामध्ये मौजे माजीवाडे ,साकेत रोड येथील स.न.३८६/३ या पैकी स.न.३८६/७ अ,३८६/८/अ ही जागा राबोडी पोलीस ठाण्याच्या अधिपत्याखाली आहे. या बाबत ची सविस्तर माहिती मिळणे करीता मा. वन परिक्षेत्र अधिकारी,कांदळवन,ठाणे यांचे कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येवुन सदर कार्यालयाकडुन वनपाल श्री.मोरे व त्यांचे सहकारी हे स्वतः वर नमुद भुखंडाची पाहणी करणे करिता दि.१२/१२/२०२२ रोजी उपस्थित राहुन त्यांनी सदर भुंखडाची पाहणी करून त्याबाबत चा सविस्तर पंचनाम केलेला आहे. सदर पंचनामा करते वेळी ठाणे पोलीस आयुक्तालय यांचे अधिपत्याखाली असलेले भुंखड स.न.३८६/३ या पैकी स.न.३८६/७/अ, ३८६/८/अ, या मध्ये कुठेही भरणा केलेला असल्याचे आढळुन आलेले नाही.तसेच वनपाल श्री.मोरे यांनी सदर पंचनामा व रिपोर्ट तयार करून सदरचा अहवाल ते प्रथम आर.एफ.ओ. व त्या नंतर डी.एफ.ओ. ऑफीस यांना सादर करणार असुन तद्नंतर डी.एफ.ओ. ऑफीस कडुन सविस्तर अहवाल प्राप्त होईल अशी माहीती वरिल संदर्भ क्र २ अन्वये मिळाली आहे. त्यामुळे सदर पाहणी केल्याचा अहवाल अदयाप इकडील कार्यालयात प्राप्त झालेला नाही.सदर माहीती लवकरात लवकर प्राप्त करणे करिता पाठपुरावा करित असुन सदरची माहीती प्राप्त होताच लागलीच सविस्तर अहवाल सादर करण्याची तजविज ठेवलेली आहे.

(ए.जी.वाघमारे)
सहा पोलीस आयुक्त वि.शा.ठाणे
पोलीस सह.आयुक्त ठाणे यांचे करीता

प्रत माहीतीकरिता सादर.
१)मा.विभागीय आयुक्त,कोकण विभाग नवी मुंबई.
२)जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,महसुल शाखा,ठाणे.
३)मुख्य पर्यावरण अधिकारी तथा सदस्य सचिव,ठामपा.कांदळवन समिती, ठाणे.